वाचा: शासन अधिसूचना क्र. एमएलआर. १५९५/५/एक्साईज-२ दि. २५ जुलै १९९६.

<u>परिपत्रक</u>

विषय: मळी निर्यातीवरील पर्यवेक्षण शुल्क कमी करणे....

=====

क्र. एमएलआर. ११९५/५-अ

मुंबई, २८ ऑगस्ट १९९६.

शासनाच्या उपरोल्लेखित अधिसूचनेप्रमाणे राज्याबाहेर/देशाबाहेर निर्यात होणाऱ्या मळीवर "पर्यवेक्षण शुल्क" म्हणुन प्रति मे. ट. रु.५०/- [रु. पन्नास फक्त] ३१ ऑक्टोबर १९९६ पर्यंत वसूल करावयाचे आहेत. सदर अधिसूचनेत ..."पर्यवेक्षण शुल्क" मुंबई मळी नियमावली, १९५५ च्या नियम १४ ते २१ प्रमाणे निर्यात किंवा वाहतूक परमिट देतांना प्रत्येक निर्यातदार/वाहतूकदार यांच्यावर आकारण्यात यावे आणि वसूल करण्यात यावे" असा उल्लेख आहे. काही अधिकारी राज्यांतर्गत मळीच्या वाहतूक परवान्यासाठी किती फी आकारावी या विषयी साशंक असल्याचे निदर्शनात आले आहे. म्हणून स्पष्ट करण्यात येते की, वरील अधिसूचनेतील वाहतूक परमिट हा शब्दप्रयोग राज्याबाहेर/देशाबाहेर होणाऱ्या मळी निर्यातीच्या वाहतुकी संदर्भात आहे. हा उल्लेख राज्यांतर्गत मळी वाहतूकीशी संबंधित नाही. राज्यांतर्गत मळी वाहतुकीसाठी परमिट देतांना मुंबई मळी नियम १९५५ च्या नियम १२ प्रमाणे प्रति मे. टन फक्त १ रु. [एक रुपया] फी वसूल करण्यात यावी.

<u>आयुक्तांच्या आदेशाने.</u>

[पं. बा. सावंत],
सह आयुक्त,
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता.

प्रति

१. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
२. सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क.
३. या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी.
४. अभिलेख शाखा [पाच प्रती]